# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 24/08/2015 (का.प.क्र.7) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 24 ऑगस्ट 2015 रोजी (का.प.क्र .07) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.25 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला उपआयुक्त (प्र) नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
03. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
04. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
05. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
06. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
07. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
08. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
09. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
10. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
11. स.स.श्रीमती शेख समीना इलियास
12. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
13. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

**विषय क्र. 10 :**

कर मुल्य निर्धारक व संकलक प्रस्ताव सादर करतात की, श्री.राजेश साहेबराव जाधव, कनिष्ठ लिपीक, कर आकारणी विभाग यांनी त्यांची आई श्रीमती इंदुबाई साहेबराव जाधव यांच्या अँजीओप्लास्टी सर्जरी करीता औरंगाबाद महानगरपालिके तर्फे मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या मान्यतेने अग्रिम प्रमाणक क्र.40150, दिनांक 28.03.2014 अन्वये रक्कम रू.1,50,000/- अग्रीम म्हणून रूबी हार्ट केअर सेंटर औरंगाबाद यांच्या नांवे अदा करण्यात आले होते. संबधित कर्मचाऱ्यानी त्यांचे आईच्या औषधोपचारासाठी रू.2,52,432/-(अक्षरी रु.दोन लक्ष बावन्न हजार चारशे बत्तीस फक्त) इतका खर्च केलेला आहे.महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र वेखप्र-20101/प्र.क्र./333/11/राकावि-2,मंत्रालय मुंबई 32 दिनांक 16.11.2011 अन्वये रु.2 लक्ष पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाचे मंजुरीचे अधिकार मा.आयुक्त यांना आहेत.रक्कम रु. 2 लक्षच्या वरील रकमेच्या मंजुरीचे अधिकार मा.स्थायी समितीस आहेत. श्री.राजेश जाधव यांनी,खर्च केलेल्या रु.2,52,432/- रकमेपैकी अनुज्ञेय रक्कम रु.2,42,083/- येत. अनुज्ञेय रकमेच्या 90% रक्कम रु.2,17,875/- (अक्षरी रु.दोन लक्ष सतरा हजार आठशे पचाहत्तर मात्र) इतकी आहे. त्यामधून एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रु.12,622/- (अक्षरी रु बारा हजार सहाशे बावीस फक्त) मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे. संबंधिताच्या नांवे असलेल्या अग्रिम रकमेसह रक्कम रु.2,05,253/- (अक्षरी रु.दोन लक्ष पाच हजार दोनशे त्रेपन्न मात्र) एवढया वैद्यकिय खर्चास मंजुरी होणे आवश्यक आहे.तसेच संबंधितांना अदा केलेले अग्रिम र.रु.1,50,000/- मनपा फंडात वळते करुन अग्रिम समायोजन मान्य करुन उर्वरीत रक्कम रु.55,253/- संबंधितास अदा करण्याच्या मान्यतेस्तव मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.राजेश साहेबराव जाधव, कनिष्ठ लिपीक, कर आकारणी विभाग यांनी त्यांचे आई श्रीमती इंदुबाई साहेबराव जाधव यांच्या अँजीओप्लास्टी सर्जरी व औषधोपचारासाठी र.रू.2,52,432/-(अक्षरी रु.दोन लक्ष बावन्न हजार चारशे बत्तीस फक्त) इतका खर्च केलेला असून र.रु.2,52,432/- रकमेपैकी अनुज्ञेय रक्कम रु.2,42,083/- व अनुज्ञेय रकमेच्या 90% रक्कम रु.2,17,875/- (अक्षरी रु.दोन लक्ष सतरा हजार आठशे पचाहत्तर मात्र) इतकी आहे. त्यामधून एकत्रित दाखल केलेला खर्च देयकाच्या 5% रक्कम रु.12,622/- (अक्षरी रु बारा हजार सहाशे बावीस फक्त) मनपा फंडात जमा करून तसेच संबंधिताच्या नांवे असलेल्या अग्रिम र.रु.1,50,000/- मनपा फंडात वळते करुन उर्वरीत रक्कम रु.55,253/- संबंधितास अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 11 :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद शहरापासून उत्तरेस 5 किमी अंतरावर खाम नदीवर हर्सुल शिवारात सन 1956 मध्ये धरण बांधलेले आहे. या धरणाची एकूण साठवण क्षमता 6.79 दशलक्ष घनमीटर इतकी असून उपयुक्त पाणी साठविण्याची क्षमता 6.11 दशलक्ष घनमीटर इतकी आहे. धरणाची पुर्ण संचय पातळी ही 28 फुट असून या तलावातून सन 1956 पासून शहरास प्रतिदिन 10 दलली इतका पाणी पुरवठा केला जातो. शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी दगडी बांधकामामध्ये उद्‌भव विहिर (Jackwell) तयार करण्यात आलेली असून या विहिरीत विविध पातळयांवर तीन ठिकाणी झडपा बसविलेल्या आहेत. या योजनेमध्ये 450 मी मी व्यासाच्या आर.सी.सी. जलवाहिनीद्वारे पाणी जलशुध्दीकरण केंद्र येथे आणून पाण्यावर प्रक्रिया करुन शुध्द पाण्याचा पुरवठा दिल्लीगेट जलकुंभास केला जातो. हर्सुल तलाव शहरापासून उंचावर असल्याने हर्सुल तलाव ते जलशुध्दीकरण केंद्र व जलशुध्दीकरण केंद्र ते दिल्लीगेट जलकुंभ या दरम्यान असलेली जलवाहिनी ही गुरुत्व पध्दतीने कार्य करते. या योजनेकरीता विद्युत शक्तीची आवश्यकता नसल्याने पाणी उत्पादनाचा खर्च हा जायकवाडी योजनेच्या तुलनेत अत्यल्प आहे.

ही व्यवस्था महानगरपालिका अस्तित्वात येण्यापुर्वी पासूनची आहे. शहराची व्याप्ती व मर्यादित लोकसंख्या यामुळे या उद्‌भवाचे पाणी सन 1972 पर्यंत शहरास पुरेसे होते. तथापि वाढत्या लोकसंख्येमुळे व हर्सुल तलावाची क्षमता कमी असल्याने शहराच्या पाणी पुरवठ्याकरीता जायकवाडी उद्‌भवावरुन दोन योजना कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. तथापि सद्यस्थितीतही हर्सुल उद्‌भवावरुन शहराच्या काही भागात जसे लोटा कारंजा, हर्ष नगर, लेबर कॉलनी, गणेश कॉलनी, बुढ्ढी लेन, आरेफ कॉलनी, अशंतः घाटी परिसर, हीना नगर, रशिदपुरा इत्यादी भागात दिल्लीगेट जलकुंभावरुन पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत हर्सुल धरण आटले असून योजनेद्वारे होणारा पाणी पुरवठा बंद आहे.

सन 2012-13 या वर्षी हर्सुल धरण पुर्णपणे आटल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हर्सुल तलावातील गाळ काही प्रमाणात काढण्यात आलेला आहे. सन 2013-14 या वर्षी हर्सुल तलावात 21 फुट इतकी पाणी पातळी झाली होती. सन 2014-15 या वर्षी पुरेसे पर्जन्यमान न झाल्याने हर्सुल तलावात नव्याने पाणीसाठा होऊ शकला नाही. तथापि सन 2012-13 या वर्षी काढण्यात आलेला गाळ तसेच सन 2013-14 या वर्षी तलावातील पाणीसाठा यामुळे हर्सुल तलावातून शहरातील काही भागांना पाणी पुरवठा केला गेला. सद्यस्थितीत शहराचा पाणी पुरवठा जायकवाडी उद्‌भवावर अवलंबून असला तरीही हर्सुल तलावातून मिळणारे 5 ते 6 द.ल.ली पाणी जायकवाडी योजनेवरील भार कमी करण्यास उपयुक्त ठरते.

मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र. 2013/मशाका-2/मुसनी/कावी-1165 दिनांक 14 जून 2013 अन्वये मुख्यमंत्री सहायता निधी (दुष्काळ 2013) अंतर्गत हर्सुल तलावातील गाळ काढण्यासाठी

रक्कम 2 कोटी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. तथापि त्यावेळी पावसाळा सुरु असल्यामुळे हर्सुल तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेता आले नाही.

प्रकरणी प्राप्त परिस्थिती लक्षात घेता व गाळ काढण्यासाठी धरण पुर्णपणे कोरडे असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2013-14 च्या दर सुचीनुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या ई-निविदा शाखेमार्फत निविदा कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. या कामा अंतर्गत साधारणत: 16,250 चौरस मीटर इतक्या क्षेत्रफळातील 47,120 घनमीटर इतका गाळ काढण्याचे प्रस्तावित असून या कामामुळे साधारणत: 47,120 घनमीटर इतक्या प्रमाणात पाणीसाठा वाढणार आहे.

उक्त कामाकरीता ई निविदा विभागामार्फत दिनांक 19.03.2015 रोजी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. विहीत मुदतीत दोन निविदा प्राप्त झाल्यामुळे सदरील निविदेस दोन वेळा निविदा दाखल करण्यास मुदतवाढ देण्यात आली. तरीही दिनांक 29.04.2015 रोजी पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदांच्या तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता खालीलप्रमाणे दोन निविदा दाखल झाल्याचे निदर्शनास आले.

1. श्री. शेख मेराज शेख इलियास - शेख कन्सट्रक्शन
2. श्री. अनिरुध्द अे सेठ - एस.एम.सी. इन्फ्रासट्रक्चर्स प्रा. लि.

उपरोक्त दोन्ही प्राप्त निविदांचे दस्तावेज तपासले असता निविदा अटी व शर्तीनुसार श्री.शेख मेराज शेख इलियास-शेख कन्सट्रक्शन यांनी अर्हते संदर्भाने दस्तावेज सादर केलेले नसल्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरली. त्यामुळे त्यांची Financial Bid उघडण्यात आली नाही.

दिनांक 08.05.2015 रोजी सक्षम अधिकारी यांचे मार्फत पात्र निविदा धारक एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. यांची Financial Bid उघडण्यात आले असता रु. 1,88,92,444.06 (म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कम रु. 1,98,76,322/- पेक्षा 4.95 टक्के कमी दर) प्राप्त झाले आहेत.

करीता सदर निविदा मंजुरी करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

चर्चा :

श्रीमती समीना शेख :किती निवीदा आलेल्या होत्या.

कार्य.अभियंता(पापू) :दोन टेंडर आलेले होते.

श्रीमती समीना शेख :शेख कन्स्ट्रक्शनचे टेंडर का घेतले नाही.

कार्य.अभियंता पापू :त्यांचे कॉन्ट्रक्टर रजिस्टेशन क्लास ए पाहिजे क्लास -3 चे होते आठ पैकी तीन डाकुमेन्ट नसल्याने रिजेक्ट झाले.

श्रीमती समीना शेख :त्यांचेशी पत्रव्यवहार केला का ?

कार्य.अभियंता पापू :यात पत्रव्यवहार नसतो टेंडर देतांना डाकुमेन्ट त्यांनी सबमीट करायचे असते.

श्री.विकास एडके :हर्सुल तलाव कुणाच्या अंडरमध्ये यासाठी निधी केंव्हा आला व आतापर्यत कार्यवाही का केली नाही.

कार्य.अभियंता-पापू :हा तलाव मनपाच्या अंडरमध्ये सन 2012-13 मध्ये 2 कोटी फंड प्राप्त तेथील गाळ काढण्याचे संदर्भात मा.विभागीय आयुक्त व मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत कार्यवाही सुरू झाली पंचनामा केला त्यानंतर टॅंक मध्ये पाणी आले जोपर्यत पाणी आटत नाही तो पर्यत काम करता येत नव्हते.त्यानंतर अंदाजपत्रक केले निविदा मंजूरीसाठी दिली आहे.

कार्य.अभियंता-पापू :निविदा मंजूर करून घेणार, उन्हाळयामध्ये गाळ काढणार आहे.निविदेचा कालावधी वाढविलेला आहे त्यानंतर निविदा काढली

श्रीमती समीना शेख :तलावाची देखरेखचे काम मालमत्ता व गाळ काढण्याचे पाणी विषयीचे काम पाणीपुरवठा विभागाकडे असे का ?

श्री.अ.रहिम नाईकवाडी:किती निविदा आल्या उत्तर दिले नाही.एक निविदा अपात्र एकच निविदा शिल्लक असे असेल तर फेर निविदा काढायला पाहिजे. हर्सुल तलावातून 4-4 जेसीबी लावून रेती ,मुरूम घेवून जात असल्याचे फोटो मी आणले.शासनाचा निधी असेल तरी त्यात मनपाचाही पैसा असतो शासनाला आपण कर भरतो.उन्हाळयामध्ये गाळ काढणार पाणी असेल तर काम होणार की नाही आज सांगता येत नाही पाऊस केंव्हाही येऊ शकतो.सध्या गाळ उचलला जात आहे गार्डनसाठी आपण माती खरेदी करतो. तेथील ऑलरेडी गाळ उचलला आहे. 1000रू प्रमाणे एक गाडी गाळ व मुरूम 800रू प्रमाणे विकत आहे. मालमत्ता विभागाने लक्ष दयावे व हे टेंडर रिकॉल करावे किंवा रद्य करावे.यात मनपाचाही पैसा आहे.नुकसान होऊ नये.हा निधी योग्य ठिकाणी वापर व्हावा.

श्री.विकास एडके : हर्सुल तलावातून ऑलरेडी 500-1000 ट्रॅक्टर रोजचे गाळ घेऊन जात आहे हे टेंडर रिकॉल किंवा रद्य करावे. एक पेक्षा जास्त निविदा असायला पाहिजे.

श्रीमती समीना शेख :अधिकारी व ठेकेदार यांचेत संशयास्पद चालू आहे.गाळाचे दोन कोटी लाटण्याचा डाव जगजाहिर होते आहे.

श्री.नितीन चित्ते :शासनाकडून निधी लवकर येत नाही आता निधी मिळत आहे.शहरात पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होतो.सामान्य जनतेचा विचार करता यात टेंक्नीकलत्रृटी असतील त्या संबधीत ठेकेदारास सांगून दुर करून कार्यवाही करावी रिकॉल करणे योग्य नाही.तेथून गाळ काढला जातो हे सर्वांना माहिती आहे.जो गाळ आता काढणार आहे तो टेक्नीकल अधिकारी तेथे बसवून मोजावा व त्यानुसार ठेकेदारास बील दयावे.जेणे करून शासनाचा निधी योग्य वापरला जाईल.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :मी पत्र देऊन माहिती मागितली,दिली नाही विचारणा केली असता तेथून गाळ काढण्यास परवानगी दिली असे जमशेद नावाचे कर्मचारी सांगतात हा विषय मंजूर करू नये.

श्रीमती रेश्मा कुरैशी :47.120 घनमीटर गाठ काढणार व पाणी साठणार याची मोजणी कशी केली.

श्री.गजानन बारवाल :अनेकदा असे झाले की गाळ काढावा व पाणी साठवण करावे. दुदैवाने ते झाले नाही यापुर्वी दोन वेळेस टेंडर रिकॉल काही कारणास्तव काम झाले नाही.ही रक्कम कमी आहे यात पुर्णच काम होणार नाही हे टेंडर मंजूर करावे व मोफत गाळ घेवून जाण्याचे आवाहन करावे.

श्री.अ.रहिम नाईक वाडी :टेंडर वेळी असलेला गाळ व त्यानंतर घेऊन गेलेला गाळ तो उचलण्याचा त्याचा खर्च यातून कमी करणार काय ?

शहर अभियंता :या ठिकाणी मा.श्री.राहूल गांधी व तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय येऊन गेले होते त्यावेळी तत्कालीन शासनाने 02 कोटी गाळ काढण्यासाठी देऊ केले पैसे येण्यास उशीर झाला.निधी आला तेंव्हा धरणात पाणी होते.तसेच लगतचा बगीचा आहे 1 कोटी गाळ काढण्यास व एक कोटी बगीच्यासाठी वापरावे असे निर्देश होते. पैसे गाळ काढण्यासाठी आले.बगीच्यासाठी 1 कोटी दयावे मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केला परंतु यासाठी नियम असतात मा.मुख्यमंत्री सहायता निधीतून ही रक्कम आलेली आहे.असे सांगितले.व म्हणून अधिक वेळ न लावता निविदा केली.निविदा काढण्याचे काम टेक्नीकल विभगाचे असते.आताच म्हटले की कॉन्टीटी कशी मोजली. दोन कोटी रक्कम यासाठी आहे त्यात जो गाळ निघेल तो काढला जाईल.शेतकरी एका जागेवरून गाळ नेत नाही जागोजागी खड्डे करतात यातून आता

सिस्टमॅटीकपणे गाळ काढला जाईल.वाटॅर यूटीलिटीचे काम आपण का करायचे प्रश्न केला हा सोर्स काम आहे पाणीपुरवठा योजना हॅडवर्क केले पाणी निर्माण करून देण्याची जबाबदारी मनपाची ,कंपनीची नाही.तेथून किती गाळ नेला किती वाहने भरून गेली याचे मोजमाफ करून त्यानुसार बील देऊ,कामाची निकड लक्षात एक जरी टेंडर असेल तर विशिष्ट टेंडर मध्ये असा निर्णय आपण घेतो तसा निर्णय घेतला मंजूरीसाठी ठेवले. ड्रेनेज मध्ये दोन टेंडर होते त्या बाबतीत निर्णय घेतला जे 25 लक्षच्या पुढील रक्कमेचे काम असेल अशी स्थायी समितीच्या मंजुरी शिवाय कार्यवाही करीत नाही.

श्री.मकरंद कुलकर्णी :जास्तीत जास्त गाळ काढावा जास्तीचा निधी मागवावा व यास मंजूरी दयावी.

श्री.अ.रहिम नाईकवाडी :मुरूम तेथून लोक नेत आहे परवानगी दिली आहे का ?दिली नसेल तर मालमत्ता विभागाचे अधिकारी काय करतात.

शहर अभियंता :मुरूम न्यायला नाही पाहिजे जात असेल तर बंद करता येईल परवानगी देता येत नाही.

श्रीमती समीना शेख :तेथील मोठा गाळ काढला आहे. पुढील वर्षी करीता रिटेंडर करावे.

मा.सभापती :मुरूम नेत असेल तर थांबवावे.

श्री.नितीन चित्ते :पाण्याचा विषय आहे गाळ काढणे जरूरी आहे.

मा.सभापती :या विषयी चर्चा झाली महाराष्ट्र शासनाने निधी दिलेला आहे.जी काही कॉन्टींटी निविदे मध्ये नमूद करण्यात आली आहे तेवढी कॉन्टीटी काढण्याच्या अटीवर या निविदेला मंजूरी देण्यात येते.

श्रीमती समीना शेख :रिकॉल करण्यात यावे.दोनच निविदा आलेल्या होत्या. तीन यायला पाहिजे.

मा.सभापती :आपला विरोध नोंदवून ही निविदा मंजूर करण्यात येते.मुरूम घेऊन जात आहे परवानगी दिली का माहिती दयावी.

मालमत्ता अधिकारी :या तलावा स्थळी तत्कालीन मा.मुख्यमंत्री व मा. श्री राहूल गांधी यांची भेट दिली होती.त्यावेळेस नागरीक गाळ घेऊन जात होते.तो गाळ काढण्याची प्रक्रिया कशी होते हे सर्व बघून हे दोन कोटी शासनाने मंजूर केले तक्रारी आल्या की गाळा बरोबर रेती नेत आहे.प्रशासकीय अधिकारी व इमारत निरीक्षक यांना तेथे असा प्रकार होऊ देऊ नये आदेशीत केले तेथील 50-60 नागरीक मा.महापौरांना भेटले व गाळ नेऊ द्या, असे म्हटले. रेती व मुरूम कोणी नेणार नाही याची दखल घेतली जाईल.

श्री.मकरंद कुलकर्णी :जे रेती मुरूम नेतील त्यांचे मशीनरी जप्त करावे.

श्री.अ.रहीम नाईकवाडी :संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

मा.सभापती :रेती मुरूम कुणी घेऊन जाणार नाही याची दखल घ्यावी. जे अधिकारी तेथे नियुक्त केले होते त्याचे बाबतीत चौकशी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद शहरापासून उत्तरेस 5 किमी अंतरावर खाम नदीवर हर्सुल शिवारात बांधलेल्या हर्सुल तलावातील गाळ काढण्यासाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र. 2013/मशाका-2/मुसनी/कावी-1165 दिनांक 14 जून 2013 अन्वये मुख्यमंत्री सहायता निधी (दुष्काळ 2013) अंतर्गत रक्कम रू.2 कोटी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेले असल्यामुळे, हर्सुल तलावातील गाळ काढण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी पात्र निविदाधारक एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. यांच्या उघडण्यात आलेल्या Financial Bid नुसार त्यांचे प्राप्त दर रु.1,88,92,444.06 (म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कम रु.1,98,76,322/- पेक्षा 4.95 टक्के कमी दर) यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 12 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मालमत्ता विभागामार्फत शहरातील विविध रस्त्यावरील 15 जाहिरात कमानी (गॅन्ट्रीज) ची निविदा मागितल्या असता लेखा विभागामार्फत एकुण -13 निविदांची विक्री झाली, निविदा स्विकारण्याची तारीख दि.15/07/2015 पर्यंत होती. तथापी, अर्जदारांची मागणीनुसार बेबाकी प्रमाणपत्र व इतर बाबींसाठी निविदेची मुदत दि.23/07/2015 पर्यंत वाढवुन देण्यात आली होती. त्यानुसार एकूण 11 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदा लक्ष्मी ग्राफिक्स व अभिषेक ॲडस यांच्या दोन निविदा कागदपत्रांची पूर्तता केली नसल्याने उघडण्यात आल्या नाहीत. उर्वरीत 9 निविदा मुख्य लेखा परीक्षक व लेखाधिकारी यांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या त्याचे दर खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | आधारभुत किमंत प्रतिकमान/प्रतिमाह रू. | निविदा रक्कम प्रतिकमान/प्रतिमाह |
|---|---|---|---|
| 01. | इथॉस मिडीया | 5886/- | 22000/- |
| 02. | ड्रिम्स क्रिएशन | 5886/- | 21888/- |
| 03. | उपेंद्र पब्लिसीटी | 5886/- | 18000/- |
| 04. | द अल्ट्रा आऊटडोअर्स प्रा.लि. | 5886/- | 12999/- |
| 05. | आर.के. बाबु ट्रेडींग प्रा.लि. | 5886/- | 12501/- |
| 06. | ॲड स्पीरीटस् | 5886/- | 12031/- |
| 07. | टार्गेट ॲडस् | 5886/- | 12031/- |
| 08. | अल्ट्रा आऊट डोअर | 5886/- | 11888/- |
| 09. | सुमन मिडीया | 5886/- | 10800/- |

वरील तुलनात्मक दरांचा तक्ता पाहता सर्वात जास्तीचे दर इथोस मिडीया यांचे असून त्यांचे दर 22000/- रू. प्रति कमान / प्रतिमाह (सेवा कर वगळून) असून सदर निविदा ही तीन वर्ष कालावधीसाठी असून पहिले वर्ष वगळुन उर्वरीत दोन वर्षासाठी प्रतिवर्ष 10 टक्के वाढ प्रस्तावित आहे. त्यानुसार मनपास तीन वर्षात खालीलप्रमाणे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

| अ.क्र. | वर्ष | कमानींची संख्या | निविदा दर प्रति कमान / प्रतिमाह | वार्षीक उत्पन्न रू. |
|---|---|---|---|---|
| 01. | प्रथम वर्ष | 15 | 22,000/- | 39,60,000/- |
| 02. | दुसरे वर्ष | 15 | 24,200/- | 43,56,000/- |
| 03. | तिसरे वर्ष | 15 | 26,620/- | 47,91,600/- |
| | | | **तीन वर्षात एकूण उत्पन्न रूपये** | **1,31,07,600/-** |

उपरोक्त प्रमाणे महानगरपालिकेस तीन वर्षात 1,31,07,600/- अक्षरी एक कोटी एकतीस लाख सात हजार सहाशे रू. मात्र (सेवा कर वगळून) प्राप्त होणार आहेत. करीता इथोस मिडीया यांची 22,000/- रू. प्रति कमान / प्रतिमाह दराची निविदा मा.स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर, निविदा मान्यतेनंतर करारनामा करून कार्यादेश देण्यात येईल.

श्री.गजानन बारवाल :15 जाहिरात कमानी कुठे लावणार आहे.

मालमत्ता अधिकारी :औरंगपूरा शिशु विकास शाळा, निराला बाजार तापडीया नाटयगृह समोर,पैठणगेट नुतनकॉलनी चौक,क्रांतीचौक शिवाजी महाराज पुतळयासमोर,उस्मानपुरा उत्सव मंगल कार्यालय,रेल्वेस्टेशन महानुभाव आश्रम जवळ,बसस्टॅण्ड हॉटेल कार्तीकी समोर, समर्थनगर एमपीला कॉलेज समोर,सतीष पेट्रोल पंप समोर,अमरप्रीत चौक

दर्गा रोड,आकाशवाणी चौक जालना रोड,शिवशक्ती कॉलनी,राज पेट्रोल पंप समोर सेवनहिल ते गजानन महाराज मंदीर रोड,गारखेडा सुतगिरणी चौक अशा 15 ठिकाणी कमानी असतील.

श्री.गजानन बारवाल :कमी दराची निवीदा आहे काही ठिकाण महत्वाचे आहे.यापुर्वी ज्या जाहिरात एजन्सीला परवानगी दिली त्यापेक्षा जास्त जाहिरात फलक शहरात आहे त्या बाबतीत काय कार्यवाही उपाययोजना होत आहे.

मालमत्ता अधिकारी :पुर्वी बीओटीच्या माध्यमातून दिले आर आर च्या रेट नुसार आधारभूत किमंत 5586/- होती. सर्वे केला 19 कमानी होत्या 4 कमाणी परत काढून घेण्यात येणार आहे. त्या वगळून 15 चे टेंडर काढले आता 22000 प्रति कमान प्रतिमाह असा दर आहे.

श्री.गजानन बारवाल :कमर्शियल रेट प्रमाणे हे आहे का? हे रेट कमी आहे.पुर्वीच्या जाहीरातीची रक्कम त्या त्या एजन्सीकडे थकली ती वसुली करावी.याचे रिवाईज रेट यावे पुन्हा टेंडर करावे.

मालमत्ता अधिकारी :टेंडर कॉल केल्यानंतर स्पर्धेमध्ये 5546 आधारभूत किंमत असतांना 22000 रेट आले.

श्री.गजानन बारवाल :हे रेट कमी आहे काही ठिकाणी एकच जाहिरातीचे 3 लक्ष पेक्षा जास्त रक्कम येऊ शकते क्रांतीचौक ते जालना रोड वर मोठया प्रमाणात पैसे मिळू शकतात.ते ठिकाण सुध्दा इतर जागेच्या ॲव्हरेज प्रमाणे गणले गेले.

श्री.विकास एडके :25-50 हजार प्रतिमहा एक कमानीचे हे लोक घेतात तर मनपाचे रेट एवढे कमी का? रिकॉल करावे दर वाढवून येतील मोक्याच्या जागी 3 लक्ष एजन्सी घेत आहे. वामनहरी पेठे ज्वेलर्स सध्या 3 लक्ष एका महिन्याचे देतात.

मालमत्ता अधिकारी :या दराप्रमाणे पैसे मिळतीच शिवाय संबधीतास 14 टक्के सर्वीस टॅक्स भरावा लागणार आहे.एकूण 15 कमानीचे पहिल्या वर्षी 39.60 लक्ष , दुसरे वर्षी 43.56 लक्ष तिसरे वर्षी 47.91 लक्ष असे 1.31 कोटी रूपये मिळणार आहे.

श्री.गजानन बारवाल :यापुर्वीच्या होर्डीग्ज धारकाकडून पैसे वसूल का केले नाही किती बाकी आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :14 टक्के सर्वीस टॅक्स एजन्सी भरणार नंतर प्रकरण कोर्टात जाते निवीदा भरतांना त्यांनी इनफूट ऑल टॅक्सेस असे लिहून घेतले का?

मालमत्ता अधिकारी :तसे नाही सर्वीस टॅक्स स्वतंत्र घेणार तसे नमुद केले.

श्री.विकास एडके :यापुर्वी भरलेले दाखवावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :सर्वीस टॅक्स व सर्वीस चार्ज वेगवेगळे माझ्या माहिती प्रमाणे 12 टक्क् सर्वीस टॅक्स आहे.

मालमत्ता अधिकारी :12.36 टक्के 1 जुन पुर्वी होता आता सेन्ट्रल गव्हरमेंन्टच्या पॉलीसीनुसार 14 टक्के आहे.हे आपण वसुल करून लेखा विभागामार्फत शासकीय कार्यालयात जमा केले जाईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :आलेले दर कमी आहे.फेरनिविदा काढावी यात महापालिकेचा फायदा होईल.

मा.सभापती :मनपास अधिक उत्पन्न मिळावे संबधीत एजन्सीला परत वाटाघाटी साठी बोलावे व पुन्हा फेर प्रस्ताव पुढील सभेत सादर करावे.

श्री.गजानन बारवाल :शहरात किती होर्डीग्ज, पैसे किती मिळाले कुणाकडे बाकी आहे केंव्हा पासून आहे.मा.न्यायालयात कोणाचे प्रकरण सर्व माहिती दयावी.

मालमत्ता अधिकारी :सर्वे करण्यासाठी मा.आयुक्ताची मान्यता झाली सर्वेक्षणाचे दर निश्चित करून कार्यवाही करणार आहोत.

मा.सभापती :स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांना सर्व माहिती देऊन सभागृहासमोर ठेवावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सर्व माहितीसह पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 13 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विविध रस्ते विकसीत करणे (Improvement) साठी महाराष्ट्र शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली होती. त्यानुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोई सुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतच्या कार्यवाही अंतर्गत शासन निर्णय क्र.संकीर्ण-2014/प्र.क्र.65/नवि-16 दि. 09.03.2015 नूसार रक्कम रुपये 24.33 कोटी एवढा निधी या शासन निर्णयासोबतच्या अनुसुची मध्ये दर्शविलेल्या 10 रस्त्यांच्या कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेला वितरीत करण्यात आला आहे. या शासन निर्णयात नमुद विविध अटी/शर्ती नूसार रस्त्यांची कामे करणे करीता मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

1. विभागीय आयुक्त- अध्यक्ष
2. जिल्हाधिकारी- सदस्य सचिव
3. महानगरपालिका आयुक्त- सदस्य

उक्त समितीने दिनांक 12.03.2015 रोजी झालेल्या बैठकीत या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्यासाठी मान्यता दिली होती. त्यानूसार या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती संदर्भाने दरपत्रके मागविण्यात आली असता एकुण 04 दरपत्रके प्राप्त झाली. त्या पैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक ए.पी.इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, औरंगाबाद यांचे अंदाजपत्रकीय रक्कमेवर 01.50% + सेवा कर असे आहे. त्यामुळे सर्वात कमी दर असल्याने ए.पी.इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय रक्कमेवर 01.50% + सेवा कर या दराने नियुक्ती करण्यात आलेली असून सदर नियुक्तीस उपरोक्त समितीने मान्यता दिली आहे.

शासन निर्णयात नमुद 10 रस्त्यांची अंदाजपत्रके तयार केली असता शासनाने वितरीत केलेल्या एकुण रुपये 24.33 कोटी या रक्कमेत ही 10 कामे होऊ शकणार नसल्याचे समोर आले. त्यामुळे या रक्कमेत होऊ शकणारी 05 कामे तुर्त हाती घ्यावीत आणि उर्वरीत 05 कामासाठी शासनाकडे अतिरीक्त निधीची मागणी करावी असे ठरले. त्यामुळे उक्त समितीने शासन निर्णयाच्या तरतूदीस अधीन राहून रक्कम रुपये 24.33 कोटीमधून पाच रस्त्यांची कामे व्हाईट टॉपींग पध्दतीने करण्यास तसेच सदरील 05 रस्त्यांची कामे योग्य रित्या करण्यासाठी आर्थिकदृष्टया सक्षम आणि अनुभवी कंत्राटदार मिळावा, सर्व कामे निविदा अटी/शर्तीनुसार विहीत वेळेत तसेच स्पेसिफिकेशन नुसार गुणवत्तापूर्वक व्हावी यासाठी टप्पा क्र.01 मधील खालील नमूद 05 रस्त्यांच्या कामासाठी वेगवेगळया पाच निविदा न काढता एकत्रीतपणे एकच निविदा काढण्यात यावी यास दिनांक 08.05.2015 रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकीय मान्यता दिली.

1. कामगार चौक ते महालक्ष्मी चौक
2. बाबा पेट्रोल पंप ते क्रांतीचौक
3. सेव्हन हिल ते सुतगिरणी चौक
4. कासलीवाल कॉर्नर ते तुकोबा नगर
5. गजानन महाराज मंदिर ते जयभवानी नगर चौक

त्यानूसार या नमुद पाच रस्त्याकरीता निविदा रक्कम रुपये 20.89 कोटीची निविदा दि.03.06.2015 रोजी काढण्यात आली. उक्त समितीच्या सुचनेनूसार या निविदेच्या अटी/शर्ती केंद्रीय

दक्षता आयोग (CVC) व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या Guide Lines/Norms प्रमाणे ठेवण्यात आल्या. या निविदा संदर्भाने दि.17.06.2015 रोजी सकाळी 11.00 वाजता इच्छुक कंत्राटदारा समवेत निविदापूर्व बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी महानगरपालिका आयुक्त, शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी, संबंधीत कार्यकारी अभियंता यांचेसह एकुण 08 कंत्राटदार उपस्थित होते. सदर निविदापूर्व बैठकीत कंत्राटदारांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत सदर बैठकीत विचार विनियम करुन सीएसडी (Common Set of Deviation) प्रसिध्द करण्यात आले. सदरील निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख 25.06.2015 होती मात्र सीएसडी नंतर कंत्राटदारांना निविदा दाखल करण्यासाठी किमान 07 दिवसाचा वेळ मिळावा या अनुषंगाने दि.01.07.2015 पर्यंत मुदत वाढविण्यात आली.

उक्त निविदा संबंधाने दिनांक 02.07.2015 रोजी पात्रता ठरविण्याकरीता निविदांच्या तांत्रिक कागदपत्रांचे लिफाफे कार्यकारी अभियंता व संबंधीत कंत्राटदारांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात आले. या मध्ये असे निदर्शनास आले की, या कामासाठी एकुण 08 निविदा विक्री झाल्या. त्या पैकी 03 निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तपशिल खालील प्रमाणे,

1. मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.
2. चारणीया कंन्स्ट्रक्शन
3. कल्याण टोल इन्फ्रास्ट्रक्चर लि.

उपरोक्त प्राप्त 03 निविदा सोबतच्या सादर केलेल्या तांत्रिक कागदपत्रांचे मुल्यमापन करण्यात आले. या 03 निविदांपैकी 02 निविदा तांत्रिक कागदपत्रांत असलेल्या त्रूटींमुळे बाद झाल्या.

सदर प्राप्त निविदांच्या मुल्यांकनास मान्यता झाल्यानंतर प्राप्त मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्या पात्र निविदेचे Financial Bid दिनांक 15.07.2015 रोजी उघडण्यात आले. प्राप्त निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 09.13% जास्तीचे आढळून आले. उर्वरीत दोन अपात्र निविदाधारकांना त्यांचे निविदे संदर्भाने त्यांची निविदा उघडण्यात येत नसल्याचे कारणांसहीत लेखी कळविण्यात आले. या प्राप्त निविदा दरा संदर्भाने संबंधीत कंत्राटदार मे.जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांना दर वाटाघाटीस्तव कळविले असता त्यांनी निविदे मध्ये दिलेल्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 09.13% जास्त दरामध्ये 1.13% दर कमी केले असून या कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.00% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे. तरी मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.00% जास्त दराच्या निविदेस मान्यता देणेस हरकत नसावी असे वाटते.

तरी मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.00% जास्त दराच्या निविदेस आणि या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ए.पी.इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, औरंगाबाद यांची नेमणूक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून करण्यास मान्यता होणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

दिनांक 09.03.2015 च्या शासन निर्णयानूसार महानगरपालिकेस वितरीत केलेल्या रुपये 24.33 कोटीच्या मर्यादेत रस्त्यांची कामे करावयाची आहे. या कामासाठी मे.जी.एन.आय.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.00% जास्त असल्याने रुपये 1.67 कोटी एवढया रक्कमेसाठी महानगरपालिका फंडात तरतूद करणे आवश्यक असल्याने, यासही यासोबत मान्यता व्हावी.

चर्चा :

श्री.गजानन बारवाल : शहरातील डिफर्ड पेमेंटचे 13 व्या वित्त आयोगामधून जे रस्ते हाती घेतले ते काम पुर्ण झाले की नाही किती पेंडींग आहे. मा.राज्यमंत्री यांचेकडे बैठक झाली त्यात काय निर्णय झाला.

शहर अभियंता :शासनाने एकूण 10 रस्त्यासाठी हा निधी उपलब्ध करून दिला होता अंदाजपत्रक तयार केले असता यात 10 रस्ते होऊ शकत नाही हे लक्षात आले. या कामाच्या

संदर्भात मा.विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली समिती त्यांचेपुढे हा विषय ठेवला त्यानंतर या रक्कमेत किती रस्ते होऊ शकतात अहवाल द्यावा, त्यांनी सुचविले त्यानुसार 5 रस्ते सिमेंन्ट कॉक्रीटचे होऊ शकतात व असे ही ठरले की यापुढे डांबरी रस्ते करायचे नाही,त्यानुसार यात पाच रस्ते मेन्शन केले. अहवाल समितीकडे दिला. टेंडर संदर्भात स.सदस्य श्री.नितीन साळवी यांनी राज्य मंत्री महोदय यांचेकडे तक्रार केली होती 31/07/2015 रोजी राज्यमंत्री महोदय यांचेकडे सुनावणी होती त्यात मनपाची बाजू मांडण्यात आली स.लोकप्रतिनिधी उपस्थित होते.त्यांनी त्यांची बाजू मांडली की संबधी ठेकेदारांची कागदपत्र असतांना ती गहाळ केली. परंतु कागदपत्र लोड झाली पासवर्ड त्यांचेकडेच आहे. कुणाचे कागदपत्र काढून घेता येत नाही. त्यावर सूचना मिळाल्या की, संबधीतांना विन्डोच ओपन करून सर्व कागदपत्र दाखवावी त्यानुसार त्यांना दाखवले स.श्री.साळवी नितीन यांनी सुध्दा पत्र दिले की, माझा गैरसमज झाला तक्रार परत घेत आहे. दुसरा मुद्दा समोर आला की, या ठेकेदाराची कामे अपुर्ण आहे हे सत्य असले तरी या पाच कामासाठी निधी आहे डिफर्डची कामे 13 व्या वित्त आयोगातील काही कामे भुसंपादनामूळे बाकी आहे. काही कामाचे पेमेंन्ट देऊ शकलो नाही. ती ही कामे होतील तसेच ही कामे वेळेवर होणार आहे.

श्री.गजानन बारवाल : बाकीचे जी कामे ती पीएमसीने वेळेवर का करून घेतली नाही. तो ठेकेदार काम करण्यास तयार आहे. पेमेंन्ट मिळाले नाही तर पीएमसी काय काम करीत होती.

शहर अभियंता :भुसंपादनाचे काम एजन्सी करीत नाही. काम चांगले होते की नाही हे पीएमसी बघते.

श्री.अब्दुल नाइकवाडी : पीएमसीचे ऑफिस कुठे आहे. वेळोवेळी पीएमसीचे लोक स्थळ पाहणी करतात का?

श्री.गजानन बारवाल :जो विषय समोर आला ही मोठी समिती आहे परंतु मा.मंत्री महोदय यांचे या संदर्भात लिखित आदेश आहेत का?

शहर अभियंता : तसे आदेश आलेले नाही टेंडरचा जो कामावधी आहे तो आता जाऊ नये. सुनावणी साठी बोलवले होते.

श्री.विकास एडके :या विषयी प्रश्नचिन्ह आहे तर टेंडरीग किंवा इतर कार्यवाही होऊ नये. जसे जळगांव येथे झाले नगरसेवक मत्री महोदय यांना जेल मध्ये जावे लागले यास मान्यता दिली तर आम्हालाही जेल मध्ये जाण्याची वेळ येऊ नये यात त्रुटी आहे चौकशी चालू आहे तर टेंडरींग करू शकत नाही. तसेच जी एन आय इन्फ्रास्ट्रक्चर यांनी डिपॉजीट रक्कम भरली का? तसेच तीन टेंडर पैकी एक गहाळ झाले तर दोन टेंडर असेल तर रिकॉल करता येते. ही तातडीची सर्व्हीस नाही चारणीया कंन्स्ट्रक्शन यांनी डिपॉजीट दिले नाही. ज्या कंपनीला काम देतो त्यांचेकडे काम केलेचे प्रमाणपत्र असायला पाहिजे या एजन्सीने कम्प्लीशन सर्टीफिकेट दिलेले आहे का किंवा कुठले काम केले ते दाखवावे. ते डाकुमेंट आवश्यक आहे त्या शिवाय देऊ शकत नाही. एकाच कंपनीला हे पाच कामे दिली ते 2-3 वर्षात काम करेल त्यावर अंकुश राहणार नाही. वेगवेगळया एजन्सीला काम दिले असते तर 5-6 महिण्यात काम करण्याचे लिमीट आले असते व कामाच्या कॉलीटीत फरक पडला असता.

श्री.गजानन मनगटे :शहरात रस्त्याची कामे अर्धवट आहे, बदनामी होते, वेळेवर काम केले नाही तर काय कार्यवाही करणार प्रत्येक रस्त्यावर प्रत्येक दिवशी काम वेळेवर न केल्यास दंड लावण्याचे हमी पत्र लिहून घेतल्या शिवाय मंजूरी देऊ नये.

श्री.अब्दुल नाईकवाडी :या ठेकेदारास कामाचे पेमेंन्ट दिले नाही हे काम दिले जाते मागिल पेमेंन्ट करावे तर हे काम करतो अशी परीस्थिती निर्माण होऊ नये.

शहर अभियंता :मा.विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय समितीने मान्यता दिली त्यानुसार सादर केले.

श्री.गजानन मनगटे :मनपामध्ये 50 ते 1 लक्ष पगार अभियंत्याना देतो त्यांचेकडून काम करून घ्यावे पीएमसीला काम देऊ नये.

शहर अभियंता :स्पेशल काम पीएमसी मदत घ्यावी लागणार शासनाचे जीआर मध्ये दिले की पीएमसी नेमून काम करावे, कामाची प्रत चांगली ठेवावी, वेळेवर करावे.

श्रीमती सलीमा शेख :पीएमसी साठी जाहीर प्रगटन देऊन कोटेशन मागविले जाते का?

शहर अभियंता :कोटेशन मागविले जाते. वेळ कमी होता जे 11-12 लोक आहे त्यांना पत्र लिहिले रेट मागविले त्या रेट नुसार मा.विभागीय आयुक्त यांचे कमेटी समोर ठेवले, त्यांनी मान्यता दिली.

श्री.विकास एडके :या प्रकरणी चौकशी चालू आहे सुनावणी होत आहे.

शहर अभियंता :चौकशी चालू नाही सुनावणी संपलेली आहे सुचना केल्या होत्या कार्यवाही केली

मा.सभापती :शहर अभियंता यांनी सांगितले की मा.मंत्री महोदय यांनी सुनावणीसाठी बोलविले होते ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही केली

श्री.विकास एडके :लेखी काही आले नाही.

मा.सभापती :.लेखी, तोंडी सुचना होत्या त्यानुसार कार्यवाही केली.

श्रीमती समीना शेख :तीन टेंडर पाहिजे एक बाद झाले आहे. दोन होते

श्री.अब्दुल नाईकवाडी :एजन्सीकडून लिहून घ्यावे की मागिल पैसे मागणार नाही हे काम करू.

शहर अभियंता :एजन्सीकडून तसे लिहून घेऊ

श्री.विकास एडके :ज्या अटी शर्ती दिल्या आहे त्यात ही एजन्सी बसत नाही.

मा.सभापती :कमेटीने स्कुटनी केली त्यानुसार निविदा समोर आली. निविदेच्या अटी शर्ती संदर्भात खुलासा करावा.

शहर अभियंता :समितीने निर्णय घेतला की एकाच एजन्सीला काम द्यावे, चांगले काम होईल वेगवेगळया एजन्सीला काम दिले तर ते एक दुसऱ्याकडून मशिनरी आणतात काम वेळेवर व चांगले होत नाही.

श्री.विकास एडके :या एजन्सीने चांगले काम केलेले दाखवा

शहर अभियंता :एजन्सी चांगले काम करीत नाही हे केंव्हा म्हणू शकतो की ती एजन्सी जर ब्लॅक लिस्ट असेल, ही एजन्सी तशी नाही.

श्रीमती समीना शेख :या एजन्सीचे एक ही काम पुर्ण झाले नाही.

श्री.विकास एडके :रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक रस्त्याचे काम या एजन्सीचे अर्धवट आहे. दुसऱ्या एजन्सीला दयावे रिकॉल करावे.

श्रीमीत समीना शेख :यात कुणाचे हित आहे का?

मा.सभापती :या निविदे संदर्भात स्पेशीफिक विषय असेल तर बोलावे.

श्री.विकास एडके :माझा विरोध नोंदवून घ्यावा.

श्री.गजानन मनगटे :पीएमसीला विरोध आहे वाटाघाटीसाठी बोलावे सर्व्हीस टॅक्स आपल्याकडून घेणार का सर्व्हीस कंपनी देते तर त्यानींच भरावा.

मा.सभापती :पीएमसी आपण नेमतो, टेंडर आपल्याकडून घेत आहेत, त्यामुळे त्यांचेकडून ते एक्ट्रा वसुल करण्यात येणार. सर्वीस टॅक्स भरणार आहे.

श्रीमती रेश्मा कुरैशी :काम खराब झाले तर जबाबदार कोण आहे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | :पीएमसी आहे, अधिकारी आहे शहर अभियंता देखरेख करतील कमेटी आहे. चांगले काम करून घेणार या अटीवर काम देऊ |
| श्री.विकास एडके | :काम अर्धवट असतांना एजन्सीला 18-18 कोटी रक्कम दिली. |
| श्री.नितीन चित्ते | :एवढा मोठा निधी शासनाने दिला मा.मुख्यमंत्री तसेच राज्यमंत्री महोदय व सर्व युतीचे लोकप्रतिनिधी यांचे अभिनंदन करावे प्रस्ताव देत असतांना एम-2 चा रोड 10 रस्त्यात होता तो वगळला परंतु आता बजेट मध्ये तरतूद करावी. व्हॉईट टॉपींग रस्ता करावा. |
| श्री.विकास एडके | :जुन्या शहरात यापैकी एकही रस्ता नाही. |
| मा.सभापती | :शासनाने रस्त्याची सुधारणा व्हावी म्हणून येथील लोकप्रतिनिधी मा.अतुलजी सावे, मा.खासदार श्री.रावसाहेब दानवे मा.पालकमंत्री रामदासजी कदम व तर सर्व युतीचे मंडळी असतील त्यांचे प्रयत्नातून रस्ते चांगले होण्यासाठी 25 कोटीचा निधी दिला त्या संदर्भात मा.विभागीय आयुक्त मा.जिल्हाधिकारी मा.मनपा आयुक्त यांची कमेटी नियुक्त करून त्यांनी सर्व गोष्टी तपासून आलेला निधी योग्य प्रकारे वापर व्हावा या उद्देशाने पीएमसी सह नियुक्त करून कमेटी नियुक्त करून ही निविदा मंजूरीसाठी आहे. या निविदेमधील अटी शर्तीनुसार वेळेत हे काम पुर्ण करण्यासाठी योग्य ती दक्षता घेवून व योग्य तो दर्जा राखून काम करून घ्यावे निविदा मंजूर करण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील 1.कामगार चौक ते महालक्ष्मी चौक, 2.बाबा पेट्रोल पंप ते क्रांतीचौक,3.सेव्हन हिल ते सुतगिरणी चौक, 4. कासलीवाल कॉर्नर ते तुकोबा नगर, 5.गजानन महाराज मंदिर ते जयभवानी नगर चौक या विविध रस्त्याचे व्हाईट टॉपींग पध्दतीने विकास करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 09.13% जास्त दराचे निविदाधारक मे.जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत एजन्सीकडून सदर कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 08.00% जास्त दराने करून घेणेस व अं.प. दरापेक्षा जास्तीची होत असलेली रक्कम रुपये 1.67 कोटी एवढया रक्कमेसाठी महानगरपालिका फंडात तरतूद करणेस तसेच या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार ए.पी.इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट, औरंगाबाद यांची नेमणूक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 14 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, गणवेश विनियम 2001 नुसार सर्व चतुर्थश्रेणी स्त्री व पुरूष कर्मचारी, सुरक्षा रक्षक व आरोग्य विभागातील ए.एन.एम./पी.एच.एन./स्टाफ नर्स यांना दर 04 वर्षातून एकदा हिवाळी प्रावरणे देय आहेत.

याकरीता वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यांत आल्या. दि.19/12/2013 पासून दि.26/12/2013 पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली. दि.26/12/2013 रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकूण 05 निविदा विक्री झाल्या व 05 निविदा प्राप्त झाल्या.

निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेले नमुने तपासणीकरीता शासनमान्य प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते. त्यानुसार प्रयोगशाळेचा अहवाल दि.13/10/2014 रोजी प्राप्त झालेला असून मे.अभय ट्रेडर्स, मे.क्रिश इंटरप्रायजेस् व मे.ओके ट्रेडर्स या तीन निविदाधारकांनी दिलेले नमुने आवश्यक निकष पूर्ण करीत असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे. त्यानुसार निविदाधारकांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. त्यापैकी मे.अभय ट्रेडर्स व मे.ओके ट्रेडर्स यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या इतरांपेक्षा कमी आहेत.

परंतु दोन्ही निविदाधारकांचे प्राप्त दर जास्त असल्याने त्यांना दि.29/11/2014 रोजी वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, संबंधीत निविदाधारकांनी प्राप्त निविदेतील दरांमध्ये 10% कमी करून साहित्य पुरविण्यास लेखी सहमती दर्शविली आहे. त्यानुसार दरांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | साहित्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीअंती मान्य दर |
|---|---|---|---|---|
| 01. | मे.अभय ट्रेडर्स | वुलन स्वेटर (पुरूष) | रू.960/- | रू.864/- |
| 02. | मे.ओके ट्रेडर्स | वुलन स्वेटर (स्त्री) | रू.970/- | रू.873/- |
| 03. | मे.अभय ट्रेडर्स | ब्लँकेट | रू.780/- | रू.702/- |
| 04. | मे.ओके ट्रेडर्स | | रू.780/- | रू.702/- |

प्राप्त दरानुसार हिवाळी प्रावरणे खरेदीकरीता एकुण रू.29,33,640/- एवढा खर्च येत आहे.

करीता, मे.अभय ट्रेडर्स यांचेकडून पुरूष कर्मचाऱ्यांसाठी वुलन स्वेटर, मे.ओके ट्रेडर्स यांचेकडून स्त्री कर्मचाऱ्यांसाठी वुलन स्वेटर व मे.अभय ट्रेडर्स व मे.ओके ट्रेडर्स यांचेकडून समान प्रमाणात ब्लँकेट खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :या कर्मचा-यांना बुट ड्रेस वेळेवर दिले जात नाही यापुर्वी केंव्हा दिले यात रक्कम दिलेली नाही.

उपआयुक्त (प्र.) :शासनाच्या नियमानुसार 2 वर्षांनी बुट व 4 वर्षानंतर स्वेटर देत असतो.29 लक्षचे अंदाजपत्रक आहे.

मा.सभापती : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणवेश विनियम 2001 नुसार सर्व चतुर्थश्रेणी स्त्री व पुरूष कर्मचारी, सुरक्षा रक्षक व आरोग्य विभागातील ए.एन.एम./पी.एच.एन./स्टाफ नर्स यांना दर 04 वर्षातून एकदा हिवाळी प्रावरणे देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारक मे.अभय ट्रेडर्स व मे.ओके ट्रेडर्स यांचेशी दराबाबत झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार संबंधीत ठेकेदारांकडून प्राप्त निविदेतील दरांमध्ये 10% कमी करून खालीलप्रमाणे साहित्य संबंधीतांकडून खरेदी करण्यास तसेच हिवाळी प्रावरणे खरेदीकरीता येणाऱ्या एकुण र.रू.29,33,640/- च्या खर्चास मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | साहित्याचे नांव | निविदेतील दर | वाटाघाटीअंती मान्य झालेले दर |
|---|---|---|---|---|
| 01. | मे.अभय ट्रेडर्स | वुलन स्वेटर (पुरूष) | रू.960/- | रू.864/- |
| 02. | मे.ओके ट्रेडर्स | वुलन स्वेटर (स्त्री) | रू.970/- | रू.873/- |
| 03. | मे.अभय ट्रेडर्स | ब्लँकेट | रू.780/- | रू.702/- |
| 04. | मे.ओके ट्रेडर्स | | रू.780/- | रू.702/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. 15 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरामध्ये विविध रस्त्यांचे White Topping द्वारे रस्ते विकसीत करावयाची कामे हाती घेण्यात आलेली आहेत. सदरच्या कामांसाठी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.349 दि.18/10/2013 अन्वये मान्यता प्राप्त होऊन मे.जे.पी. इन्टरप्रायजेस मुंबई यांचेकडून एकत्रितरित्या सुरू आहेत. सदर कामांची एकत्रित किमंत रक्कम रूपये 18.72 कोटी इतकी आहे.

तत्कालीन नगरसेवक तथा मा.सभागृह नेता श्री.किशोर नागरे व तत्कालीन नगरसेवक श्री.महेश माळवतकर यांच्या सततच्या मागणीप्रमाणे तसेच छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते जळगांव रोड जंक्शन पर्यंत रस्ता अतिशय खराब झाल्यामुळे या रस्त्याच्या कामाचे 1.00 कोटी रू. चे अंदाजपत्रक तयार करून त्यास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.706 दि.20/01/2015 अन्वये कामाचे 1.00 कोटी वाढीव रक्कमेसह

सुधारीत अंदाजपत्रक र.रू.19.72 कोटीला मान्यता घेण्यात आली असून, सदर वाढीव काम मे.जे.पी. इन्टरप्रायजेस, मुंबई यांचेकडून मंजुर निविदा दर 7.50% जास्त दराने करण्यास मंजुरी झाली आहे.

त्यानुसार सदरचे वाढीव काम करण्यासाठी मे.जे.पी. ईंटरप्रायजेस यांना पत्र क्र.मनपा/शअ/ वार्ड अभि-ब/08/2015 दि.13/01/2015 अन्वये कळविण्यात आले होते. मात्र संबंधीतांनी काम सुरू न केल्याने संबंधीत कंत्राटदार यांना सदरील काम 48 तासाच्या आत सुरू करावे नसता Risk & Cost वर इतर उपलब्ध गुत्तेदाराकडून करून घेण्यात येईल, असे कळविले. त्यावर संबंधीत कंत्राटदार यांनी दि.26/05/2015 व दि.24/06/2015 ला पत्र देऊन खुलासा केला आहे की, त्यांनी केलेल्या कामाचे मनपाकडे सुमारे 8.00 कोटी रूपयांची देयके प्रलंबीत आहेत. त्यामुळे त्यांचे मशिनरी, मजुर व बाजारातील देणी थकल्यामुळे सदरील वाढीव काम आर्थिक अडचणीमुळे करणे शक्य होणार नाही.

सदरील रस्ता हा टि.व्ही. सेंटर भागातील मुख्य बाजारपेठेतील व वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्याची खड्डे पडल्यामुळे दयनीय अवस्था झाली आहे. पावसाळयाच्या दिवसांमध्ये आणखी खड्डे पडून नादुरूस्त होत आहे. सदरील रस्ता मजबुतीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. नवनिर्वाचित सदस्य हे रस्ते बांधकामाची मागणी करीत असून सतत पाठपुरावा करीत आहेत.

त्यामुळे वरील स्थिती व मागणी पाहता सदरील काम हे Risk & Cost वर करून घेण्याचे ठरले. त्यानुसार बाजारातील या प्रकारची कामे करणाऱ्या नोंदणीकृत व अर्हताधारक गुत्तेदाराकडून करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात आली. त्यानुसार विहीत मुदतीमध्ये खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदाराचे नाव** | **प्राप्त निविदा दर** |
|---|---|---|
| 01. | मे.आर.के.कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.99% जास्त दराने |
| 02. | के.बी.पाथ्रीकर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.90% जास्त दराने |
| 03. | मे.पटेल कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.76% जास्त दराने |
| 04. | पंडीत इंजिनिअरींग | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 17.77% जास्त दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त दरपत्रकामध्ये मे.आर.के. कन्स्ट्रक्शन यांचे 8.99 % जास्त दराने ही तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आहे. संबंधीतास दर वाटाघाटीसाठी बोलाविले असता, संबंधीताने 8.99% जास्त दराऐवजी मे.जे.पी. ईंटरप्रायजेस, मुंबई यांचे मंजुर निविदा दर म्हणजे अं. प. दरापेक्षा 7.5% जास्त दराने करण्यास संमती दिली आहे. व त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार सदरील र.रू.1.00 कोटीचे वाढीव काम मे.जे.पी. ईंटरप्रायजेस ऐवजी Risk & Cost वर मे.आर.के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून 7.5% जास्त दराने यापूर्वीच्या म्हणजेच मुळ कामाच्या अटी / शर्तीनुसार करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, छत्रपती संभाजी महाराज पुतळा ते जळगांव रोड जंक्शन पर्यंतच्या रस्त्याचे व्हॉईट टॉपींगचे वाढीव कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.99 % जास्त दराचे निविदाधारक मे.आर.के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार र.रू.1.00 कोटीचे वाढीव काम मे.जे.पी. ईंटरप्रायजेस ऐवजी Risk & Cost वर मे.आर.के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचेकडून 7.5% जास्त दराने यापूर्वीच्या मुळ कामाच्या अटी / शर्तीनुसार करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.विकास एडके :मनपाच्या प्रिया मार्केट मध्ये बीअर शॉपी चालू आहे.राकाजला जसे सील केले तशी कार्यवाही यावर का होत नाही.मा.कोर्टात जाण्यासाठी वेळ देतो का सील का लावत नाही.

मालमत्ता अधिकारी :81 डी नुसार नोटीस दिली जर भाडेतत्वावर दिले असेल व ते व्हॅकेट करून घ्यायचे असेल तर 30 दिवसाचा कालावधी दयावा लागतो.

श्री.विकास एडके :ज्या वापरासाठी दिले तो वापर होत नसेल तर त्यासाठी कार्यवाहीचे काही नियम असतील ते वापरावे.

मालमत्ता अधिकारी :नोटीस दिली आहे त्यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे लागेल त्यांचेकडे काय कागदपत्र आहे बघावे लागेल.

मा.सभापती :नियमानुसार कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :बाबा पेट्रोल पंप जवळ उड्डाण पुलाचे काम चालू आहे एमएसआरडी पुढील काम कसे करणार प्लॅनींग काय ,पदमपुरा येथे पुल करणार का पाण्याची लाईन शिप्ट करणार काय पदमपुरा येथे येऊन रस्ता थांबलेला आहे एक दर्गा दोन मंदीरे येत आहे या बाबतीत काय कार्यवाही करणार आहे

सहा.संचालक(न.र) :बैठक आयोजित केली होती काही कारणास्तव बैठक होऊ शकली नाही पुन्हा बैठक बोलविली जाईल.

श्रीमती समीना शेख :श्री.बनकर विदयुत अभियंता यांचे कामाविषयी चौकशी करण्यासाठी समिती नेमली होती पत्र दिले उत्तर दिले नाही.

उपआयुक्त प्र. :चौकशी कुठपर्यत आलेली आहे माहिती घेतो.

मा.सभापती :3 दिवसात स.सदस्या यांना लेखी माहिती दयावी.

श्री.नितीन चित्ते :गट नं 155 संदर्भात प्रश्न विचारला त्यात मुख्यलेखा परीक्षक यांना चौकशी करून अहवाल देण्याचे आदेशीत केले होते अहवाल 14-7-2015 अहवाल दिला. प्रत माझ याकडे आहे.त्यावर काय कार्यवाही केली विचारले असता उत्तर मिळाले नाही लेआऊटला स्थगिती मिळाली होती अहवाल आल्यानंतर काय कार्यवाही केली.

सहा.संचालक (न.र) : अहवाल माझ्याकडे आलेला नाही.

मुख्यलेखा परीकक्षक :या संबधीचा अहवाल मा.आयुक्ताकडे सादर केलेला आहे.

उपआयुक्त (प्र.) :अहवाल मा.आयुक्ताकडे दिला असे म्हटले तो आस्थापना विभागाकडे गेलेला असेल.

मा.सभापती :हा अहवाल सभागृहासमोर ठेवण्या बाबत सुचना करण्यात येते.

श्री.नितीन चित्ते :अहवाल दिल्यानंतर 1-1 महिणा सभेसमोर येण्यास लागत असेल तर योग्य नाही हा लेआऊट तात्काळ नामंजूर रद्य करण्यात यावे.

मा.सभापती :या प्रकरणात मा.आयुक्तांनी स्थगिती दिलेली आहे चौकशी समिती नेमली होती अहवाल प्रशासनाकडे आलेला आहे.त्यानुसार कार्यवाही करून दोषीवर काय कार्यवाही केली त्यांचा अहवाल सभेपूढे ठेवावा.

श्री.अब्दुल नाईकवाडी :तेरणा हायस्कूल जवळील भुखंड मनपास 2006 आलेला आहे.त्या बाबतीत मालमत्ता विभागास लिगली माहिती नव्हती.असे कितीतरी जागा असतील ते मनपास माहित नाही. तो प्लेग्रांऊड आहे प्रेरणा हायस्कूलला देऊ नये.वार्डातील मुलांना खेळण्यासाठी ठेवावा.

मालमत्ता अधिकारी :स.सदस्यांनी पत्र देऊन शाळेची व ग्राऊंडची माहिती विचारली होती त्यानुसार शाळेने मालमत्ता कर भरल्याची पावती त्यांना दिली.या शाळेने बाजूची जागेची मागणी केली तो सिडकोचा भुखंड तो दयायचा असेल तर सिडकोचे नाहकरत प्रमाणपत्र घ्यावे लागते. त्यांनी जेवढे कालावधीत वापरले त्यांचेकडून वसुली करण्या बाबत कार्यवाही होईल.

श्री.नितीन चित्ते :काल वृत्तपत्रात 14 कोटीचा महाघोटाळा असे आले. सुवर्ण जयंती योजनेमध्ये जे 2-5 वर्षापासून काम चालू आहे अशा बातम्या येतात.या योजनेसाठी ठराविक रक्कम प्राप्त होते.जे लाभार्थी झाले व आता रजिस्टर्ड लाभार्थी त्यांची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करावी.बातमी आली त्यात तथ्य असेल चौकशी व्हावी.सत्यता समोर येत नाही तोपर्यत आलेला निधी वापरू नये.

| | |
|---|---|
| प्रकल्प संचालक | :पुढच्या संचिका सुध्दा मंजूर आहे त्यासाठी ग्रँण्ड आहे.चौकशी करून लेखी कळविले जाईल. |
| मा.सभापती | :योग्य ती चौकशी करून अहवाल सादर करावा तोपर्यंत आलेला निधी वापरू नये.योग्य व्यक्तीपर्यंत निधी गेला पाहिजे याची दखल घ्यावी.यादी वाटपास स्थगिती देण्यात येते.जे लाभार्थी झाले व रजिस्टर्ड लाभार्थींची यादी वेबसाईटवर प्रसिध्द करावी. |
| श्री.गजानन बारवाल | :वार्ड ड कार्यालयासाठी कनिष्ठ अभियंता देण्यात यावे. |
| शहर अभियंता | :या पदाच्या अनेक जागा रिक्त आहे. वारंवार विभागास सुचना दिल्या आहे.या कार्यालयासाठी जे ई देण्याची कार्यवाही केली जाईल. |
| मा.सभापती | :त्वरीत या कार्यालयासाठी शाखा अभियंता दयावे व रिक्त पदे ताबडतोब भरावे. |
| श्री.ईरशाद खान | :यशोधरा कॉलनी येथील शाळेवर वॉचमन नाही.अनधिकृत कुणी तरी तेथे राहत आहे.विभागास तसे पत्र दिले कार्यवाही केली नाही. |
| मा.सभापती | :दखल घेवून चौकशी करावी कार्यवाही करावी. |
| श्रीमती समीना शेख | :सातारा देवळाई येथे मनपा पाणीपुरवठा करीत आहे असे सांगण्यात आले होते त्याची निवीदा काढली होती का ? |
| कार्य.अभियंता पापू | :मनपाच्या निविदेप्रमाणे ठरविलेली एजन्सीच काम करीत आहे.तातडीने पाणीपुरवठा करावा अशा सुचना होत्या. |
| मा.सभापती | :या बाबतीत रेट ठरलेले आहे.तातडीने पाणी देणे गरजेचे होते. |
| श्री.नितीन चित्ते | :लाईट बंद आहे 30 जून रोजी ठेका संपला आहे मुदतवाढ दिल्यानंतरही किती प्रामाणिकपणे काम केले. |
| मा.सभापती | :मागच्या बैठकीत मुदतवाढ दिलेल्या एजन्सीची चौकशीचे आदेश दिले होते ऑडीट करावे त्यानंतर बील दयावे असे निर्देश दिले आहे.आता नव्याने निविदा झाल्या उघडल्या आहे लगेच कार्यवाही होईल. |
| श्री.नितीन चित्ते | :मुदतवाढ देऊनही काम केले नाही अधिकारी सदस्यांना ब्लॅकमेल करतात की बील मिळत नाही तरी सुध्दा तीच एजन्सी टेंडर भरते.लाईट लावल्यानंतर सदस्य एनओसी देत नाही तोपर्यत बील अदा करू नये. |
| शहर अभियंता | :सदस्यांच्या सुचनाची दखल घेत आहोत.किती लाईट कुठे लावले सदस्यांच्या मार्फत माहिती आणून दिल्याशिवाय बील देणार नाही. |
| श्री.नितीन चित्ते | :27 लाईनमन आहे.11-12 वार्डासाठी एक लाईन मन नेमावे. उर्वरीत स्ट्रीट लाईट साठी राहतील.एलईडी लाईटसाठी शासनाचा निधी आला होता त्यात एम-2 व लेमन्ट्री हॅाटेलचा रस्ता घेतला.एजन्सीची देखभाल दुरूस्तीची मुदत संपल्यानंतर ते काम कुणी करायला पाहिजे.लाईनमन वर कुणाचे कन्ट्रोल नाही. |
| शहर अभियंता | :श्री. देशमूख व श्री.दामोधरे दोन जे ई आहे.सर्व काम ते पाहू शकत नाही रिक्त पदे आहे ती भरल्यास काम करणे सोईचे होइल. |
| श्री.अब्दुल नाईकवाडी | :श्री.कोल्हे यांचेकडे पाणी पुरवठयाचा चार्ज दिला जनतेला पाणी पिण्यास नाही रस्त्यावर पाणी वाहते दुरूस्ती करण्याची तक्रार केली ती काम केले नाही.ते योग्य उत्तर देत नाही. |
| मा.सभापती | :मी स्वतः तेथे पाहणी साठी येईल कार्यवाही करण्याचे आदेशित केले जाईल. |

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद